Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2510S01V13P011

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Oct'25
Issue–X(I), Volume–XIII

# महाराष्ट्रातील शिक्षण महर्षी महात्मा फुले यांचे कार्य

**डॉ.वैभवी प्रकाश देहूकर**
सहाय्यक प्राध्यापक,
मराठी विभाग, कला शाखा,द महाराजा सयाजीराव विद्यापीठ, बडोदे.
मोबाईल:९४२७००२७५८
इमेल : vaibhavi.d-marathi@msubaroda.ac.in

**सारांश**

19 व्या शतकात **महात्मा फुले यांनी** भारतामध्ये स्त्रीशिक्षणाची चळवळ सुरू केली. त्यांच्या स्त्री शिक्षणाच्या या क्रांतिकारक विचारामुळे स्त्री शिक्षणाचा प्रारंभ झाला. त्यांनी ही समाजसुधारणेची चळवळ सुरू केली असली तरी त्याला पुढे नेण्याचे कार्य बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे),कोल्हापुरचे राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक विचारवंत,समाजसुधारक यांनी केलेले दिसून येते.

स्त्री शिक्षणाच्या परिवर्तनवादी विचाराने स्त्री वर्गाची गुलामगिरीतून सुटका होऊन ती स्वावलंबी होऊ शकते,हे महात्मा फुले यांनी जाणले होते. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व जाणून स्त्री वर्ग आणि समाजातील उपेक्षित वर्ग यांच्या शिक्षणावर भर दिला होता. त्यामुळे हळूहळू स्त्री शिक्षणाचा प्रसार झाला आणि स्त्रिया शिक्षण,नोकरी यासाठी घराबाहेर पडू लागल्या. त्यातूनच स्वतःची कारकीर्द घडवू लागल्या. त्यामुळेच आज 21 व्या शतकात प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचा वावर आपल्याला दिसून येतो. त्याचे श्रेय महात्मा फुले यांना दिले पाहिजे.

**मुख्य शब्द :** महात्मा फुले , भारतीय समाज, भारतीय स्त्रियांचे स्थान, स्त्री शिक्षण

विद्या प्राप्त करणे हे मानवी जीवनाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्या हा समाज परिवर्तनासाठी अत्यंत महत्त्वाचा आधार आहे. आधुनिक समाजाची जडण घडण होत असताना शिक्षण हा घटक महत्त्वाचा ठरतो. म्हणूनच महाराष्ट्रात महात्मा फुले यांनी शिक्षणाशिवाय मानवी जीवनाला अर्थ नाही हे सिद्ध केले.

इंग्रजांच्या आगमनापूर्वी महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्था पाहिली तर ती ब्राह्मणवर्गापुरती मर्यादित होती. व्यवसायांचे शिक्षण हे जातीनुसार आणि परंपरेने दिले जात असे. एकंदरीत शिक्षण व्यवस्था ही त्याकाळातील राज्यकर्त्यांची जवाबदारी मानली जात नसे.

अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्रात इंग्रजांचे राज्य स्थापित झाले. त्यांच्याबरोबर आलेल्या ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणाऱ्या मिशनऱ्यांनी धार्मिक व शैक्षणिक कार्य सुरू केले. त्यानंतर जॉन स्टुअर्ट मिल यांच्या काळात शिक्षण ही इंग्रज सरकारची जवाबदारी मानली गेली. त्यानुसार प्राथमिक शाळा सुरू झाल्या. त्यामागे ही ख्रिस्ती धर्माचा प्रसार हा हेतू होताच. पुढे जाता 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना झाली. या संस्थेने महाराष्ट्रात अनेक ठिकाणी इंग्रजी शाळा सुरू केल्या. त्यानंतर मुंबईत 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' ची स्थापना करण्यात आली. या संस्थेद्वारा अनेक शाळांची स्थापना, अभ्यासक्रम तयार करणे, फी माफीची सवलत, देशी भाषांना उत्तेजन, क्रमिक पुस्तके देशी भाषेतून तयार करणे, इ. कार्य केले गेले आणि महाराष्ट्रात सार्वत्रिक शिक्षणाचा प्रयत्न सुरू झाला.

इंग्रजांनी सुरू केलेल्या नवीन शिक्षण व्यवस्थेमुळे समाजातील विविध वर्गातील मुलं शिकू लागले. या काळातच जोतीबा फुले यांच्या वडिलांनी जोतीबाचे नाव इंग्रजी शाळेत घातले आणि जोतिबांच्या शिक्षणाचा प्रारंभ झाला. त्याकाळी त्यांनी जेवढे शिक्षण घेतायेईल तेवढे घेतले. त्यामुळे त्यांना सरकारी नोकरी ही मिळाली असती परंतु त्यांनी तसे न करता आपला घरचा परंपरागत व्यवसायच करू लागले. त्यादरम्यान लोकसेवा व लोककल्याणाचा विचार त्यांच्या मनात होताच. या काळातच त्यांच्या जीवनात जातीभेदाची दाहकतेचा अनुभव देणारी एक घटना घडली आणि त्यांनी समाजव्यवस्था, जातीव्यवस्थेच्या विरुद्ध बंड पुकारले. आपली समाजव्यवस्था श्रेष्ठ- कनिष्ठ जातीव्यवस्था मानणारी असून त्यामुळे होणारे शोषण त्यांच्या लक्षात आले. तसेच या व्यवस्थेमुळेच सामाजिक व मानसिक गुलामगिरी कनिष्ठ वर्गाच्या वाट्याला आली होती. तसेच हिंदू धर्माच्या नावाखाली कनिष्ठ वर्ग आणि स्त्री वर्गाचे शोषण होत आहे. याची जाणीव जोतीबांना झाली आणि म्हणून या कनिष्ठ वर्ग आणि स्त्री वर्गाला मनुष्य म्हणून जगण्याचा अधिकार न देणाऱ्या या गुलामगिरीतून मुक्त करून त्यांच्या जीवनात पुन्हा चैतन्य निर्माण करण्याचे ध्येय मनाशी बाळगले. त्यासाठी जोतिबांनी शिक्षणाचे महत्त्व जाणून सर्वांसाठी ज्ञानाचे द्वार उघडून देण्याचा निश्चय केला. अशा प्रकारे सर्वांसाठी शिक्षण सध्या करण्याचा विचार आला. त्याला कारण शिक्षणाचे महत्त्व त्यांना समजले होते. त्या संदर्भात धनंजय कीर लिहितात, "अज्ञान म्हणजे अंधार व शिक्षण म्हणजे प्रखर सूर्यप्रकाश. हा प्रकाश अज्ञानांधकार नष्ट करून मनुष्याचे जीवन चैतन्यमय करून सोडते. जीवित पूर्णपणे विकसित करण्याचे आणि जगण्याचे. शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे. कोणत्याही समाजात द्रुतगतीने स्थित्यंतर घडवून आणण्यापूर्वी शिक्षणाचा प्रसार करणे अत्यावरयक असते, ती मूलभूत अशी एक आवश्यकताच असते. शिक्षणाने मनुष्याला सत्यासत्याचा नि अंतिम हिताचा विचार करण्याची शक्ति प्राप्त होते. स्वाभिमानाची जाणीव त्याच्यात जागृत होते. म्हणून शिक्षण हे सर्व सुधारणेचे मूळ आहे." १ अशाप्रकारे शिक्षणाचे महत्त्व जोतिबा फुले यांनी ओळखले होते.

"जोतिराव ने जो पहला महत्त्वपूर्ण कार्यक्रम तय किया वह था शिक्षा का प्रसार | उनका विचार था कि हिंदू समाज में नारियों और शूद्रो को भी शिक्षा प्राप्त होनी चाहिए | उन दिनों ब्राह्मण समाज भी नारियों को शिक्षित करने के विरुद्ध था |जोतिराव ने यह तय किया कि बालिकाओं के लिए एक पाठशाला प्रारंभ की जाए | यदि नारी पढी-लिखी हो जाती है तो घर भी एक पाठशाला बन जाता है क्योंकि माता स्वयं ही संतान की शिक्षिका बन जाती है |" २

या कारणानेच महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचाही प्रारंभ केला. परंतु त्याकाळात असलेले अत्यंत जुनाट बुरसटलेल्या विचारांच्या लोकांनी त्यांचा उग्र विरोध केला. त्यामुळे जोतिबांनी सुरू केलेल्या मुलींच्या शाळेत शिक्षक मिळेना. अशावेळी जोतिबांनी आपली पत्नी सावित्रीबाई यांना घरीच शिकवून आपल्या मदतीला सहाय्यक शिक्षक म्हणून शाळेत आणले. अशाप्रकारे सावित्रीबाईंचा शिक्षण क्षेत्रात प्रवेश झाला आणि हिंदू स्त्रीचा पुन्हा सार्वजनिक क्षेत्रात प्रवेश झाला.

जोतिबांच्या अशा बंडखोर प्रवृत्तीमुळेच त्यांना आपल्या वडिलांचे घर ही सोडावे लागले. आपल्या समाज सुधारणेच्या कार्यासाठी वडिलांशी वाईटपणा आला तरी जोतिबा आपल्या कार्यापासून परावृत्त झाले नाही.

भारतात हिंदू मुलींची पहिली शाळा कलकत्त्यास अमेरिकन मिशनने सुरू केली असली तरी स्वतंत्रपणे हिंदू मुलींची शाळा काढणारे जोतिबा हेच पहिले भारतीय आहे. मुलींची शाळा चालविण्यासाठी जोतिबांना

त्यांच्या अनेक मित्रांनी मदतही केली. जोतिबांचे हे मित्र शाळेतील मुलांनाही वेगवेगळी मदत करत असे. जोतिबांनी हाती घेतलेल्या महान कार्याविषयी धनंजय कीर लिहितात, "ही कामगिरी फारच मोठी होती. समाजातील अत्यंत कानिष्ठातील कनिष्ठ वर्गाला भारताच्या इतिहासातील तीन हजार वर्षाच्या कालखंडानंतर प्रथमच ज्ञानाची कवाडे उघडण्यात आली. ही आश्चर्यकारक क्रांति घडविणारे जोतिबा हे पहिले भारतीय होत." ३.

अशाप्रकारे फुले यांनी ज्ञानाची गंगा समाजाच्या खालच्या थरापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर सुशिक्षित अशा उच्च वर्गालाही समाजातील कनिष्ठ वर्गाचा विचार करायला प्रवृत्त केले. कनिष्ठ वर्गासाठी शाळा सुरू केल्यानंतर वाचनालयचाही प्रारंभ केला गेला. त्यासाठी जोतिबांच्या अनेक मित्रांनी सहाय्य केले.

त्याकाळात जोतिबांनी केलेले शैक्षणिक क्षेत्रातील कार्य पाहून अनेक सरकारी संस्थांनी इंग्रज सरकारचे त्याकडे लक्ष वेधले होते आणि त्यांच्या कार्याचे महत्त्व जाणून त्यांचा बहुमान करण्याचे सुचविले. त्याप्रमाणे इंग्रज सरकारने जोतिबांचा बहुमनही केला. तसेच जोतिबां यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कामगिरीची नोंद त्याकाळातील इंग्रजी वृत्तपत्रानीही घेतली कारण जोतिबांच्या कार्यामुळे स्त्रीशिक्षणाची नवी पाऊलवाट निर्माण झाली तसेच कनिष्ठ वर्गासाठी शिक्षणाचे क्षेत्र उघडून दिल्यामुळे सामाजिक समतेचे क्रांतीचे आद्य जनक म्हणून ही ओळखले जाऊ लागले. अशाप्रकारे महाराष्ट्रात इंग्रजांच्या आगमनानंतर 'ज्ञान प्राप्ती ही मनुष्य जीवनाची एक महत्वाची शक्ती आहे. शिक्षणामुळेच मनुष्याचे सर्वांगीण जीवनात बदल होऊ शकतो. तसेच शिक्षण हे समाज सुधारणेचे मूळ आहे.' असे विचार प्रचलित होते.

अशा काळात जोतिबा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व जाणून समाजातील सर्व वर्गासाठी ज्ञानाची दारे खुली करून दिली सर्वांना शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली. त्यांच्या मते मानसिक, आर्थिक, धार्मिक, गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी ज्ञान प्राप्ती हाच एक मार्ग आहे. त्यासाठी त्यांनी त्याकाळात प्रचलित अशी वरिष्ठ वर्गातून कनिष्ठ वर्गापर्यंत पाझरत जाणाने शिक्षण व्यवस्थेचा विरोध केला.

ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेकडे इंग्रज सरकारचे लक्ष वेधले. ज्यामुळे सामान्यजनांपर्यंत शिक्षण व्यवस्था जाऊन पोहचेल. तसेच इंग्रज सरकारही शिक्षण हे वरिष्ठ वर्गापुरतेच मर्यादित राहील असे धोरण बाळगत होते.

इ. स. १८८२ साली आलेल्या हंटर आयोगापुढे जोतिबांनी सर्वसामान्य जनतेच्या शिक्षणालाही महत्त्व दिले जावे असे मत मांडून वैत्रिक शिक्षणावर भर देण्यास सांगितले.

जोतिबांनी शिक्षणाचे महत्त्व, स्त्री पुरुष समतेचा संदेश देणारे 'तृतीय रत्न' हे मराठी नाटक ही लिहिले होते.

अशा प्रकारे महात्मा जोतिबा फुले यांनी 19 व्या शतकात जगाची नवीन जडणघडण घडवित समाजाच्या जुनाट चालीरीती परंपरा, रूढी यांना बाजूला करून बहुजन वर्गाला जागृत करून ज्ञानाची गंगा त्यांच्यापर्यंत पोहचवली. आत्ता 21 व्या शतकात उभा असलेला बेकारीचा प्रश्न आणि त्यावर असलेले उपाय हे 19 व्या शतकात महात्मा फुले यांनी सांगितले आहे. जोतिबांनी शिक्षणाचा प्रसार करताना त्यांनी व्यवहारज्ञान आणि व्यावसायिक कौशल्या प्राप्ती करण्यावर ही भर दिला होता. त्याकाळात ही जोतिबांच्या लक्षात आले होते की शिकून सगळ्यांनाच नोकऱ्या मिळणार नाहीत.

जोतिबांनी सांगितलेले शिक्षणाचे महत्व, समतेचा संदेश हा फक्त भारतातच नाहीतर संपूर्ण विश्वाने स्वीकारावा असा आहे. जोतिबांनी सुरू केलेल्या समतेच्या लढ्यात दलित चळवळीचे मूळ पाहू शकतो.

महात्मा फुले यांनी मनुष्यत्वाची प्रतिष्ठा ही महत्वाची मानली.त्यांनी आपल्या समाजाच्या विकासाला कारण होणाऱ्या तत्वांची विचारप्रणाली आपल्या साहित्यातून आणि कृतीतून मांडली.

महात्मा फुले हे समाजक्रांतीचे अग्रणी होते.आपल्या समाजात जागृती आणण्यासाठी शिक्षण क्षेत्रात चळवळ सुरू केली.आपल्या धर्मविषयक जागृतीसाठी सत्यधर्म चळवळ चालवली .या सगळ्या चळवळीसाठी साहित्यनिर्मिती केली. त्याबद्दल डॉ.वासुदेव मुलाटे लिहितात, "आपल्या स्वप्नातील समाजक्रांतीच्या कार्याला,स्थिर,विधायक आणि संघटित स्वरूप देण्यासाठी सामाजिक प्रबोधनाबरोबरच प्रबोधनाचे वांग्मय निर्माण करणे त्यांना गरजेचे वाटत होते." ४ समाजातील विषमता दूर करण्यासाठीशोषित वर्गामधील अज्ञान दूर करणे आवश्यक आहे.त्यामुळे या वर्गाचा बौद्धिक स्तर उंचवण्यासाठी त्यांनी अतोनात प्रयत्न केले. आपल्या समाजात विविध पंथ,विविध धर्म,विविध जाती यामध्ये असलेले भेदभाव दूर करण्यासाठी संघर्ष केला.या कार्याला आधार देण्यासाठी वैचारिक लेखनही केले.

"सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यापूर्वी जवळजवळ पंचवीस वर्ष जोतीरावांनी नानाविध स्वरुपाची लोकसेवा केली होती.मुलींना आणि अस्पृश्यांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी पुण्यात शाळा काढल्या ; तसेच विधवाविवाहात विघ्ने आणणाऱ्या कर्मठ सनातन्यांपासून उच्चवर्णीय सुधारकांचे रक्षण केले; बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली आणि एका अनाथ मुलाला स्वतःचा मुलगा मानून त्याला लहानाचा मोठा केला.आपल्या घराचा हौद अस्पृश्य समजल्या जाणाऱ्यांना खुला केला." ५

आपल्या समाजातील शुद्र,सर्व जातींच्या स्त्रिया,शेतकरी या शोषित वर्गातील सर्वांना आपली दुरावस्था दूर करण्यासाठी शिक्षण प्राप्तीची संधी मिळणे आवश्यक आहे,असे महात्मा फुले दृढपणे मानत असे.

महात्मा फुले म्हणत,"विद्येविना मती गेली | मतीविना नीति गेली | नीतीविना गति गेली | गतीविना वित्त गेले | वित्ताविना शुद्र खचले | इतके अनर्थ एका अविद्येने केले." येथे अविद्येमुळे होणारे दुष्परिणाम महात्मा फुले यांनी नेमकेपणाने सांगितले आहे. या अविद्येमुळे फक्त मनुष्याचे नाहीतर समाजाचे,देशाचे ही नुकसान होते. "अविद्येचे अनर्थ किती होऊ शकतात व सर्वांना विद्या देण्याचा सरकारने विचार केला नाही, तर समाजस्वास्थ्य कसे बिघडते, पोलीसयंत्रणेवर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीमुळे सरकारला कसा खर्च करावा लागतो व हा सर्व पैसा जनतेकडूनच कररूपाने सरकार कसा वसूल करते, याचे अतिशय वस्तुनिष्ठ चित्रण जोतीराव फुले यांनी केले आहे.रिकामे मन म्हणजे भुतांचा कारखाना होय.माणसाचे मन शिक्षणामुळे सुदृढ बनविता येते. त्यात चोऱ्या,लूटमाऱ्या करण्याचे विचारच येत नाहीत म्हणून सर्वांना सक्तीचे शिक्षण देण्याची आवश्यकता जोतिबा प्रतिपादित करतात." ६

त्यावरून महात्मा फुले आपल्या भारत देशातील एक महान शिक्षण तज्ज्ञ होते. " प्राथमिक शिक्षण मोफत,सक्तीचे व सार्वत्रिक झाले पाहिजे अशी मागणी १३० वर्षांपूर्वी देशात सर्वप्रथम करणारे ते द्रष्टे महात्मा होते" ७

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात प्रथम सर्व समाजातील मुलींसाठी आणि अस्पृश्य जातीच्या मुलांसाठी शाळा सुरू केल्या.त्यासाठी त्यांनी दोन शिक्षण संस्था स्थापन केल्या होत्या.त्या म्हणजे १) नेटीव्ह फिमेल स्कूल्स इन पुणे २) दि सोसायटी फोर प्रमोटिंग एज्युकेशन ऑफ महार्स मांग्स एंड अदर्स. या

शाळांमधून समाजातील मुलामुलींसाठी शिक्षणाची सुरूवात केली.महात्मा फुले फक्त संस्थासंचालक नव्हते ते द्रष्टे शिक्षण तज्ज्ञ होते.

त्यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली.त्याचबरोबर अहिल्याश्रमात अनुसूचित जातीच्या मुलांसाठी शाळा सुरू केल्या.

महात्मा फुले यांनी व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व जाणून आपल्या शिक्षण व्यवस्थेत इयत्ता पहिली पासून शेतीचे,विविध उद्योग , व्यवसायांचे शिक्षण दिले पाहिजे,अशी मागणी इंग्रज सरकारला केली होती.त्याबरोबर त्यांनी स्वतःच्या शाळांमध्ये सर्व मुला मुलींना व्यावसायिक शिक्षण सुरुवातीपासूनच सक्तीचे केले होते. दीडशे वर्षांपूर्वी शेती ,उद्योग यांच्याशी निगडीत शिक्षण देण्याची भूमिका फुले यांची होती.त्यामुळे महात्मा फुले हे आधुनिक भारताच्या प्रगतीचे शिल्पकार ठरतात.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणविषयक कामाला समाजातून खूप विरोध झाला तरीही त्या दोघांनी न जुमानता आपले कार्य पुढे नेले.त्यांना उस्मान शेख,फातिमा शेख, गणू शिवाजी मांग,धुराजी आप्पाजी चांभार,लहूजी वस्ताद साळवे, राणबा महार,तात्यासाहेब भिडे,अन्नासाहेब चिपळूणकर,सदाशिव गोवंडे,मोरो विठ्ठल वाळवेकर अशा अनेक शिक्षकांचे,मित्र मंडळींचे सहकार्य लाभले.

महात्मा फुले यांनी १८५५ साली आपल्या घरातच प्रौढ साक्षरतेचे वर्ग सुरू केले. हा आपल्या देशातील पहिल्या प्रौढ साक्षरता वर्गाचा प्रारंभ होता आणि ही साक्षरता अभियानची सुरूवात होती.

आपल्या समाजात शिक्षणाविषयी उदासिनता होती.त्याला कारण समाजात असलेली गरीबी,पालकांची निरक्षरता,अंधश्रद्धा,शिक्षणामुळे होणाऱ्या जीवनाच्या कल्याणाविषयी अज्ञानता इ.होते. या विषयी जागृतता आणण्याचे कार्य केले.

अशाप्रकारे महत्मा फुले यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य केले. "ते पर्यायी संस्कृतीचे जनक होते.मानवी हक्कांसाठी ते अहोरात्र झगडले.जोतीरावांनी स्वातंत्र्य,समता,बंधुता(भाऊपणा व बहीणपणा),शिक्षण,जातीनिर्मूलन,स्त्री-पुरूष,शेती व शेतकरी यांचा सर्वांगीण विकास,महिला,अनुसूचित जाती,आदिवासी,भटके विमुक्त,इतर मागासवर्गीय यांचे सामाजिक संघटन,मानवी हक्कांसाठी जागृती आणि संघर्ष यासाठी अभूतपूर्व योगदान दिले." ८

अशा समाजकल्याणाच्या कार्यासाठी,सामाजिक जडणघडणीत महात्मा फुले यांचा मोलाचा वाटा आहे. अशाप्रकारे त्यांनी आधुनिक भारताच्या पायाभरणीचे काम केले आणि समता,बंधुता या वैश्विक मूल्यांना महत्त्व देऊन नैतिक परिवर्तनाचा प्रयत्न केला.

तत्कालिन समाजात भट,भिक्षुक हे सामान्य लोकांना फसवत असे. त्या काळात सामान्य लोकांमध्ये दारूचे व्यसन वाढीस लागले होते. हा वर्ग शिक्षणाचे महत्त्व जाणत नव्हता.अशा परिस्थितीत समाज सुधारणेच्या अनेक महत्त्वांच्या विचारांना सामान्यजनांपर्यंत पोहचविण्यासाठी महात्मा फुले यांनी लोकांना माहित असलेल्या वांग्मय प्रकारांचा परिणामकारक वापर केला.

महात्मा फुले यांच्या मते शिक्षण हा स्त्रियांचा मानवी अधिकार आहे.तसेच संपूर्ण देशाची प्रगती ही स्त्रीशिक्षणाशिवाय शक्य नाही, असे ते दृढपणे मानत होते.

**संदर्भसूची :**

१. धनंजय कीर, महात्मा जोतीराव फुले ,पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि. मुंबई,तिसरे पुनमुर्द्रण २००८, पृ.27
२. लेखक-तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, अनुवाद-प्रशांत पांडे,जोति चरित,नेशनल बुक ट्रस्ट,इंडिया, नयी दिल्ली,१९९५, पृ. १२
३. धनंजय कीर, महात्मा जोतीराव फुले ,पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि. मुंबई,तिसरे पुनमुर्द्रण २००८, पृ.34-35
४. संपा.वासुदेव मुलाटे ,म.जोतीराव फुले लिखित सार्वजनिक सत्यधर्म,स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद,दुसरी आवृत्ती २००४, पृ.१
५. य. दि. फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड पहिला (१९०१-१९१४), के'सागर पब्लिकेशन्स,पुणे, द्वितीय आवृत्ती २००५, पृ.५१
६. ना.ग.पवार आणि अविनाश वरोकर, भारतीय समाजक्रांतीचे  जनक -महात्मा जोतीराव फुले,पद्मगंधा प्रकाशन,पुणे.प्रथमावृत्ती २०००,पुनर्मुद्रण २००४, पृ.९७
७. संपा.प्रा.हरी नरके, महात्मा फुले :समग्र वांग्मय,महात्मा जोतीराव फुले,चरित्रे साधने,प्रकाशन समिती,महाराष्ट्र  शासन,मुंबई,आठवी आवृत्ती २०१८, पृ.२५
८. संपा.प्रा.हरी नरके, महात्मा फुले :समग्र वांग्मय,महात्मा जोतीराव फुले,चरित्रे साधने,प्रकाशन समिती,महाराष्ट्र  शासन,मुंबई,आठवी आवृत्ती २०१८, पृ.२७